SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University.

PART-ONE

गुरूवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१४

## Rule No. 3 /2014

## जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांट देखभालीबाबतचे नियम

**ज्याअर्थी** विद्यापीठ अनुदान आयोग, नवि दिल्ली तसेच विद्यापीठाचे निधीतुन उपलब्ध झालेल्या अर्थसहाय्यातुन विद्यापीठाद्वारे आयोजित करण्यात येत असलेल्या आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेच्या आयोजनाच्या उद्देशाने तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे जलतरणाचे सरावाकरिता विद्यापीठाचे परिसरात जलतरण तलावाचे बांधकाम करण्यात आले आहे.

**आणि**

**ज्याअर्थी** जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांट देखभालीचे संदर्भात विद्यापीठ राजपत्र भाग-१ च्या पृष्ठ क्र. १९५ ते १९७ वर दिनांक २२ नोव्हेंबर, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या नियम क्र. १४/२००२ आणि पृष्ठ क्र. ४२ वर दिनांक १० मार्च, २००५ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या नियम क्र. ०१/२००५ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे शक्य नसल्याने सदर नियम रद्द करून नविन नियम तयार करणे अनिवार्य झाले आहे.

**आणि**

**ज्याअर्थी** जलतरण तलावासह तसेच तेथे कार्यान्वित असलेल्या संयंत्राची दैनंदिन देखभाल करणे, जलतरण तलावाचा परिसर स्वच्छ ठेवणे, विद्यापीठात उपलब्ध असलेल्या स्त्रोतांच्या सहाय्याने जलतरण तलावात पोहण्यायोग्य पाणी भरणे, जलतरण तलावातील पाण्यासह तलावाची स्वच्छता ठेवण्याकरिता सक्शन मशिन चालविणे, फिल्ट्रेशन प्लांट दैनंदिन सुरू करणे, विभागाद्वारे खरेदी करून देण्यात आलेल्या ब्लिचींग पावडरचा आवश्यकतेनुसार वापर करणे, सक्शन मशिनची दैनंदिन देखभाल करून त्यात तांत्रिक बिघाड झाल्यास त्याबाबतची आवश्यक ती दुरूस्ती अभियांत्रिकी विभागामार्फत करून घेणे अनिवार्य आहे.

**आणि**

**ज्याअर्थी** जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांटच्या देखभालीचे संदर्भात उपरोक्त नमुद केलेली कामे वार्षिक करारनाम्यावर कंत्राटी पद्धतीने करून घेण्याकरिता दरवर्षी निविदा मागवून व विद्यापीठाच्या क्रय समितीद्वारे मंजूर करण्यात येणाऱ्या दरास व्यवस्थापन परिषदेचे मान्यतेनंतर निविदाधारकांसोबत कुलसचिव यांच्या स्वाक्षरीने करारनामा करून विद्यापीठाच्या अर्थशिर्षातुन कंत्राटदाराच्या देयकाचे शोधन दरमहा करावयाचे आहे.

**त्याअर्थी** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद खालील नियम तयार करीत आहे.

१. या नियमांना विद्यापीठाच्या जलतरण तलावासह फिल्ट्रेशन प्लांट देखभालीचे नियम-२०१४ असे संबोधण्यात येईल.
२. सदर नियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केलेल्या दिनांकापासुन अंमलात येतील.
३. या नियमांमध्ये उल्लेख केल्या जाणाऱ्या शब्दांचे अर्थ खालीलप्रमाणे राहतील.
   i. **विद्यापीठ म्हणजे** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कायदा १९८३ अन्वये गठीत विद्यापीठ
   ii. **कुलसचिव म्हणजे** महाराष्ट्र विद्यापीठे कायदा-१९९४ मधील तरतुदीनुसार नियुक्त करण्यात आलेले कुलसचिव
   iii. **जलतरण तलाव म्हणजे** आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेच्या आयोजनाच्या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोग, नवि दिल्ली यांच्याद्वारे प्राप्त झालेल्या अनुदानातुन व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे निधीतुन बांधण्यात आलेला जलतरण तलाव.
   iv. **संयंत्र व उपकरणे म्हणजे** जलतरण तलावातील पाण्याच्या शुद्धीकरणासाठी स्थापित करण्यात आलेले विजेच्या सहाय्याने चालविण्यात येणारे संयंत्र व अन्य उपकरणे.
   v. **देखभाल व उपाययोजना म्हणजे** निर्धारित कालांतराने फिल्ट्रेशन प्लांटला सहाय्य करणारे उपकरण पडताळणी करण्यासाठी केलेली उपाययोजना.
   vi. **नियंत्रण अधिकारी म्हणजे** कार्यकारी अभियंता, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
   vii. **सदस्य म्हणजे** नियमाने विहित केलेले जलतरणाचे शुल्क भरून सदस्यत्व प्राप्त करणाऱ्या व्यक्ती
   viii. **प्रभारी म्हणजे** कंत्राटदारद्वारे करारनाम्यानुसार समाधानकारकरित्या कामे करण्यात आले किंवा नाही याबाबतची खात्री करणारा, कंत्राटदारांकडून दरमहा प्राप्त झालेले देयक विहित कालावधीत शोधनाकरिता पाठविण्याकरिता कार्यकारी अभियंता, विद्यापीठ यांच्याद्वारे नियुक्त करण्यात आलेला/आलेले कर्मचारी.

४. नियंत्रण अधिकारी जलतरण तलावावर अस्तित्वात असलेल्या फिल्ट्रेशन प्लांट व त्यास सहाय्यक उपकरणांची यादी तयार करेल ज्याचा समावेश फिल्ट्रेशन प्लांट व तेथील उपकरणांचा रखरखाव करण्याकरिता कंत्राट देण्याच्यादृष्टीने उपयुक्त राहील. सदर यादीमध्ये उपकरणाचे नांव, नंबर, तपशिल, या उपकरणांना अनुक्रमांक प्रदान केला असल्यास अनुक्रमांक, खरेदीची तारीख, उपकरणांची किंमत, आश्वस्ती कालावधी (Warranty Period) आदि बाबींचा समावेश राहील.

५. वार्षिक देखभाल कंत्राटाची मुदत संपण्याच्या ०३ (तीन) महिने अगोदर पासुन नियंत्रण अधिकारी नविन कंत्राटाची कार्यवाही आरंभ करेल. सदर प्रस्ताव वित्त व लेखा समितीमार्फत व्यवस्थापन परिषदेचे मान्यतेस्तव सादर केला जाईल. सदर प्रस्तावामध्ये वार्षिक देखभालीकरिता द्यावयाच्या कंत्राटाची एकुण रक्कम आणि त्या अंतर्गत कंत्राटदाराद्वारे रखरखाव करण्यात येणा-या उपकरण व संयंत्राचा सुस्पष्ट उल्लेख राहील.

६. नियंत्रण अधिकारी निविदा सुचना काढतांना समान लेखा संहितेमध्ये नमुद करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करेल.

७. कंत्राटदाराला नियम क्र. ३/२००२ मध्ये विहित करण्यात आलेल्या नमुन्यानुसार मेन्टेनन्स कार्डचा उपयोग करावा लागेल. मेन्टेनंन्स कार्ड विद्यापीठाच्या प्रशासकीय कार्यालयात सहज उपलब्ध होतील अशा पद्धतीने ती कंत्राटदारास ठेवावी लागतील.

८. कंत्राटदारास जलतरण तलाव येथे तक्रार नोंदवही तयार ठेवावी लागेल. ज्यामध्ये संयत्र व उपकरणे या संबंधीच्या तक्रारीची नोंद घेतली जाईल ज्यावर त्यास नियंत्रण अधिका-यांची स्वाक्षरी प्राप्त करावी लागेल.

९. कंत्राटदाराद्वारे करण्यात आलेल्या रखरखावाचे प्रमाणिकरण नियंत्रण अधिका-यास सादर करेल.

१०. प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेला कंत्राटदार रखरखावाचा अहवाल नियंत्रण अधिका-यास सादर करेल.

११. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्यता प्रदान केलेल्या विहित नमुन्यातील करारनाम्यानुसार कंत्राटदार कार्य करेल. अशा पद्धतीचा करारनामा हा कुलसचिव व कंत्राटदार या दोघांमध्ये स्वाक्षरीत केला जाईल.

१२. करारनाम्यामध्ये जलतरण तलावाचा रखरखाव व संयंत्रांसह इतर उपकरणांची देखरेख करावयाच्या अटी व शर्तीचा सुस्पष्ट उल्लेख राहील.

१३. नियंत्रण अधिका-यांचेद्वारे जलतरण तलावाचा उपयोग घेणा-या विद्यापीठाच्या संबंधीत विभागास, कंत्राटदारास लागु असलेल्या अटी व शर्ती याची माहिती दिली जाईल.

१४. कंत्राटदारास प्रदान करण्यात येणारे कंत्राट व्यापक (Comprehensive) अथवा अव्यापक स्वरूपाचे राहील याबाबतचा करारनाम्यामध्ये स्पष्ट उल्लेख असेल.

१५. संयंत्रांमध्ये अथवा उपकरणांमध्ये बिघाड झाल्यानंतर बदलविण्यात आलेले सुटे भाग कंत्राटदार नियंत्रण अधिका-यांकडे तपासणी व खात्रीकरिता जमा करेल. बिघाड झालेले सुटे भाग समान लेखा संहितेतील तरतुदीनुसार अपलेखित करण्याची कार्यवाही केली जाईल.

१६. कंत्राटदाराद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या कामगाराची जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१७. कंत्राटदारास जलतरण तलावातील पाणी प्रदुषण मुक्त, पोहण्यायोग्य, स्वच्छ, स्वास्थवर्धक पद्धतीने ठेवावे लागेल.

१८. अनुक्रमांक १७ मधील तरतुदीचे पालन करण्यास कंत्राटदार कोणत्याही कारणास्तव असमर्थ ठरल्यास त्यास ती बाब तात्काळ नियंत्रण अधिका-यांचे मार्फत कुलसचिव यांना कळवावी लागेल.

१९. कंत्राटदाराला करारनाम्यातील तरतुदीनुसार देयकाचे शोधन केले जाईल.

२०. वार्षिक कंत्राटाच्या दराच्या १०% अथवा समान लेखा संहितेत नमुद टक्केवारी इतकी रक्कम कंत्राटदारास **सुरक्षा ठेव** म्हणुन कंत्राट आरंभ करण्यापुर्वी विद्यापीठ खाती जमा करावी लागेल.

२१. नियंत्रण अधिका-यास करारनाम्यामध्ये कंत्राटदाराद्वारे कंत्राटातील कोणत्याही तरतुदीचा भंग झाल्यास कंत्राटदारास जो आर्थिक दंड ठोठावयाचा असेल त्याचा स्पष्ट उल्लेख करारनाम्यामध्ये करावा लागेल.

२२. जलतरण तलावामध्ये विद्यापीठात उपलब्ध असलेल्या स्त्रोतातुन पाणी प्राप्त करून जलतरणाकरिता आवश्यक असलेली निर्धारित पातळी योग्य प्रमाणात ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. दररोज जलतरण तलाव उघडण्यापुर्वी जलतरण तलावातील पाण्याची चाचणी व पाणी पोहण्यायोग्य आहे किंवा नाही याची खात्री कंत्राटदारास करावी लागेल व त्याचा मासिक अहवाल नियंत्रण अधिका-यास सादर करावा लागेल.

२३. पाणी योग्य ठेवण्याकरिता खरेदी करावयाची रसायने, त्यांचा दर्जा व उत्पादक यांची नावे कंत्राटदाराला नियंत्रण अधिका-याला कळवावी लागेल. ज्यायोगे पाण्याचा दर्जा पोहण्यायोग्य ठेवण्याकरिता नियंत्रण अधिका-यास सदर साहित्य खरेदीची कार्यवाही करणे सोईचे होईल.

२४. रसायनाच्या असंतुलित मात्रेच्या उपयोगामुळे जलतरण तलावाच्या कुठल्याही सदस्याची जीवीत हानी झाल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदार जबाबदार राहील.

२५. कंत्राटदारास जलतरण तलावाच्या देखभालीकरिता त्याच्या स्वतःसह एकुण १० (दहा) कर्मचा-यांची नियुक्ती करावी लागेल. ज्यामध्ये फिल्ट्रेशन प्लांट ऑपरेटर -०१, डेक सुपरवायझर -०२, जीवनरक्षक-०२, चुषणसफाई कर्मचारी-०२, सफाई कामगार-०२ आणि नियंत्रक-०१ अशा पदावर कार्यरत राहणा-या व्यक्तींचा समावेश असेल व कंत्राटदार हाच त्यांचा नियंत्रक राहील.

२६. **कंत्राटदारामार्फत जलतरण तलावावर नियुक्त करण्यात येणा-या जीवनरक्षकास मान्यता प्राप्त संस्थेद्वारे प्रमाणित असलेल्या जीवनरक्षकाचे प्रशिक्षण पुर्ण केले असल्याबाबत आवश्यक असलेले प्रमाणपत्र हे निविदा भरतेवेळी कंत्राटदारास निविदेसोबत जोडणे अनिवार्य राहील व सदर प्रमाणपत्राची पडताळणी संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ यांच्याकडून प्रमाणित केल्याशिवाय त्याची निविदा स्पर्धेकरिता पात्र ठरविली जाणार नाही.**

२७. संयंत्र अथवा फिल्ट्रेशन प्लांट तसेच जलतरण तलावात मोठ्या प्रमाणात बिघाड झाल्यास त्याची सुचना कंत्राटदारास नियंत्रण अधिका-याला द्यावी लागेल.

२८. कंत्राटाच्या कालावधीचे दरम्यान कोणत्याहीपद्धतीची अडचण निर्माण झाल्यास त्यावर मा.कुलगुरूंच्या लवादाने दिलेला निर्णय हा अंतिम समजण्यात येईल.

२९. या नियमामध्ये निर्माण होणारे सर्व लवाद हे न्यायीक व सलोखा कायदा (Arbitration & Conciliation Act) च्या तरतुदीअंतर्गत निकाली काढले जातील.

स्वा./-
(अ. धो. चव्हाण)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

******

## Rule No. 4 /2014

## विद्यापीठाचे जलतरण तलावाचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे नियम-२०१४

**ज्याअर्थी** विद्यापीठाच्या जलतरण तलावाच्या सदस्याकरिता विद्यापीठ राजपत्र भाग-१ च्या पृष्ठ क्र. १८२ ते १८३ वर दिनांक १९ सप्टेंबर, २००२ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या नियम क्र. ८/२००२ आणि पृष्ठ क्र. ३५२ वर प्रकाशित करण्यात आलेल्या सुधारित नियम क्र. १५/२०१० अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करणे शक्य नसल्याने सदर नियम रद्द करून नविन नियम तयार करणे अनिवार्य झाले आहे.

**आणि**

**ज्याअर्थी** जलतरण तलावाकरिता सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे नियम अस्तित्वात असणे गरजेचे आहे.

**त्याअर्थी** व्यवस्थापन परिषद खालीलप्रमाणे नियम लागु करीत आहे.

१. या नियमांना **"विद्यापीठाच्या जलतरण तलावाचे सदस्यत्व स्विकारण्याबाबतचे नियम-२०१४"** असे संबोधण्यात येईल.

२. सदर नियम व्यवस्थापन परिषदेच्या सभेने मान्यता प्रदान केलेल्या दिनांकापासुन लागु होतील.

३. या नियमामध्ये उपयोगात आणल्या जाणा-या शब्दांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

**i)** **विद्यापीठ म्हणजे** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ कायदा-१९८३ अन्वये स्थापीत झालेले विद्यापीठ

**ii)** **नियंत्रण अधिकारी म्हणजे** संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती किंवा त्या पदावर कार्यरत असलेला प्रभारी अधिकारी.

**iii)** **प्रभारी म्हणजे** जलतरण तलावाचे सदस्य होऊ इच्छिणा-या आवेदकाने वित्त विभागात शुल्क जमा केल्यानंतर शुल्काच्या पावतीचे व आवेदन पत्राचे संकलन करणारा, सर्व शुल्कांची नोंदणी करणारा, शुल्काचे पावतीसह आवेदनपत्र स्विकारणारा, परिपुर्ण आवेदन पत्र प्राप्त झाल्यानंतर नियंत्रण अधिका-यांच्या स्वाक्षरीने सदस्यांना पासेस देणारा, जलतरण तलावाचा दैनिक रखरखाव नियंत्रित करणारा व्यक्ती.

**iv)** **सदस्य म्हणजे** नियमाने विहित केलेले जलतरणाचे शुल्क भरून सदस्यत्व प्राप्त करून जलतरण तलावाचा लाभ घेऊ इच्छिणारी व ज्यास पोहण्याचे कौशल्य ज्ञात आहे अशी व्यक्ती.

**नियम –**

१) **(a)** जलतरण तलावाचे सदस्यत्व शुल्कात आवश्यकतेनुसार वेळोवेळी खालील तक्त्यात दर्शविलेल्या रकान्यात मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार वाढ करण्यात येईल व जलतरण तलावाचे सदस्य होऊ इच्छिणा-या व्यक्तींकडून खालील शुल्क आकारण्यात येईल.

| अ.क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यापीठ पद्व्युत्तर विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठ आस्थापनेतील कायम कर्मचारी आणि विविध प्रधिकारणी/मंडळ सदस्य यांच्याकरिता सन २०१४ या वर्षापासुन लागु असलेले दर | सर्व समान्य सदस्यांकरिता सन २०१४ या वर्षापासुन लागु असलेले दर |
|---|---|---|---|
| अ) | मासिक शुल्क | रूपये ८००=०० | रूपये ९००=०० |
| ब) | त्रैमासिक शुल्क | रूपये १५००=०० | रूपये १८००=०० |
| क) | अर्धवार्षिक शुल्क | रूपये २५००=०० | रूपये ३०००=०० |
| ड) | वार्षिक शुल्क | रूपये ४०००=०० | रूपये ४५००=०० |

**(b)** उपरोक्त शुल्काशिवाय सदस्य होऊ इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तीस **नोंदणी शुल्क म्हणुन वार्षिक रूपये १००/- इतके शुल्क प्रतीवर्षी** आकारले जाईल.

२) जलतरण तलावाचे सदस्य होऊ इच्छिणा-यास कामीत कमी २५ मीटर पोहता येणे अनिवार्य आहे.

३) सदस्यत्वाकरिता नोंदणी शुल्काव्यतिरिक्त उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क हे सदस्य शुल्क म्हणुन भरावे लागेल.

४) जलतरण तलाव कोणत्याही कारणास्तव बंद ठेवण्यात आल्यास त्या कालावधीतील शुल्क कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही.

५) जलतरण तलावाचा उपयोग घेण्यासाठी जलतरण तलाव सकाळी ६.०० ते १०.०० व दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत सर्व सदस्यांकरिता उघडा ठेवण्यात येईल. प्रत्येक सदस्यास पोहण्याकरिता ४५ मिनीटांचा कालावधी त्यांने आवेदनपत्रात नमुद केलेल्या वेळेमध्ये व सर्व गुरूवार, २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, ०१ मे, होळी आणि धुलीवंदन हे दिवस वगळता उपलब्ध करून दिला जाईल. एकदा आवेदनपत्रात जी वेळ नमुद केलेली आहे त्या वेळेव्यतिरिक्त सदस्यांना इतर वेळेमध्ये पोहण्यास अनुमती दिल्या जाणार नाही. तसेच निर्धारित वेळेपुर्वी जलतरण तलावाच्या प्रवेशद्वाराचे आत सदस्यांना सोडण्यात येणार नाही.

६) प्रथमोपचाराव्यतिरिक्त कोणत्याही पद्धतीची विशेष वैद्यकीय व्यवस्था विद्यापीठ अथवा कंत्राटदार यांच्याकडून सदस्यास उपलब्ध करून दिल्या जाणार नाही.

७) प्रत्येक सदस्यांने जलतरण तलावाचा उपयोग घेण्याकरिता विद्यापीठाने त्यांना प्रदान केलेले विहित ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील व त्याशिवाय त्यास प्रवेश दिला जाणार नाही. संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ किंवा त्यांनी नामित केलेला व्यक्ती कोणत्याही क्षणी सदस्यांची ओळख तपासण्याकरिता आल्यास ओळखपत्राची मागणी करू शकेल.

८) जलतरण तलावाची खोली अधिक असल्याने पोहता येऊ शकत नसलेल्या आवेदकांचे आवेदनपत्र नाकारण्याचे अधिकार विद्यापीठाकडे अबाधित राहतील. अशा व्यक्तींना सदस्यत्व बहाल केले जाणार नाही. ज्या सदस्यांना सदस्यत्व विद्यापीठाद्वारे बहाल केले जाईल अशा सदस्यांना जलतरण तलावाचा उपयोग स्वतःचे जबाबदारीवर करावा लागेल. कुठल्याही जिवीत अथवा वित्त हानीस विद्यापीठ अथवा नियुक्त केलेला कंत्राटदार, त्यांचे कर्मचारी तसेच अन्य कर्मचारी जबाबदारी राहणार नाही.

९) आवेदकास अर्ज सादर करते वेळी सादर केलेल्या अर्जानुसार ०२ पासपोर्ट साईजचे छायाचित्र आवेदनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०) आगाऊ स्वरूपात भरलेली कोणतीही रक्कम कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

११) जलतरण तलावाचा लाभ घेण्यापुर्वी उपलब्ध असलेल्या शॉवर खाली व्यवस्थितरित्या शरीर स्वच्छ करून जलतरण तलावात प्रवेश करावा लागेल.

१२) जलतरण तलावाच्या सदस्यत्वासाठी विहित नमुन्यातील अर्ज सविस्तर भरून कार्यालयास सादर करतांना अर्जासोबत सदस्यांच्या त्वचेचे आजार, शरीरावर जखम, घाव, फोड, फुटकळी, संसर्ग आजार, डोळ्याचा संसर्गजन्य रोग नसल्याबाबतचे तसेच दमा, मिरगी, हृदयरोग असे आजार नसल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. यापैकी कोणताही आजार असल्यास सदस्यास प्रवेश दिल्या जाणार नाही.

१३) सदस्यत्वाची मुदतवाढ घेण्याकरिता सदस्यास प्रत्येक वेळी वैद्यकीय प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे.

१४) जलतरण तलावामध्ये पोहतांना दुस-यास पाण्यात ओढणे, फाजील प्रोत्साहित करणे इत्यादी कृती करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास त्याचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.

१५) लाब केस ठेवणा-या महिला व पुरूष सदस्यांनी पोहतांना उपयुक्त अशी टोपी (Cap) परिधान करणे अनिवार्य आहे.

१६) जलतरण परिक्षेत्रामध्ये पादत्राणे घालून वावरण्यास सक्त मनाई आहे.

१७) विद्यापीठ परिक्षेत्रात धुम्रपानास, मद्यपानास व वेगाने वाहन चालविण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास संबंधितांचे सदस्यत्व कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द केले जाईल व त्याबद्दल भरलेल्या शुल्काचा परतावा कोणत्याही सबबीवर परत केला जाणार नाही.

१८) जलतरण तलावामध्ये शरीरास साबण लावून स्नान करण्यास, कपडे धुण्यास व थुंकण्यास सक्त मनाई आहे.

१९) जलतरण परिक्षेत्रातील व विद्यापीठाचे बागेतील झाडे, रोपे, फुलझाडे इत्यादींना हात लावणे, इजा पोचविणे व फुले तोडणे सक्त मनाईचे आहे.

२०) जलतरण तलावाचे फिल्ट्रेशन प्लँटमध्ये तसेच कॅबीनमध्ये किंवा उद्घोषण कक्ष (Announcing Booth) इत्यादी ठिकाणी सदस्यांना प्रवेश वर्जित आहे.

२१) जलतरण तलावामध्ये पोहण्याकरिता असलेला प्रमाणित पोषाख सदस्यांना स्वखर्चाने आणावा लागेल.

२२) जलतरण तलावाचे सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणालाही तलावामध्ये पोहण्यास परवानगी दिल्या जाणार नाही.

२३) जलतरण तलावात पोहण्यासाठी येतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

२४) जलतरण तलावात पोहण्यासाठी येतांना किंमती वस्तु, सोन्या-चांदीचे दागीने, घड्याळ, मोबाईल इत्यादी वस्तु आणु नये. आणल्यास त्या वस्तु सुरक्षित सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित सदस्यांची राहील व गहाळ झाल्यास विद्यापीठ अथवा कंत्राटदार, त्यांचे कर्मचारी जबाबदार राहणार नाही.

२५) जलतरण तलावसंबंधी अधिक उपयुक्त अशा माहितीकरिता संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

२६) जलतरण तलाव स्वच्छ व पोहण्यायोग्य ठेवण्यास प्रत्येक सदस्यांनी योग्य ते सहकार्य करणे गरजेचे राहील.

२७) आंतर महाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेच्या आयोजनाकरिता किंवा कुठल्याही तांत्रिक, नैसर्गिक कारणास्तव जलतरण तलाव बंद ठेवण्याची आवश्यकता भासल्यास जलतरण तलाव बंद ठेवण्याचे सर्वाधिकार विद्यापीठाकडे राखीव राहतील. अशा परिस्थितीत जलतरण तलाव ज्या कालावधीकरिता बंद ठेवण्यात येईल त्याचे शुल्क सदस्यास परत केले जाणार नाही अथवा तितक्या दिवसाचा कालावधी पुढे वाढवून दिला जाणार नाही.

स्वा./-
(अ.धो. चव्हाण)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

कृपया
छायाचित्र येथे
चिकटवावे

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
**जलतरण तलाव सदस्यता आवेदन पत्र**

प्रति,
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती
महोदय,

मी खालील सही करणार, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जलतरण तलावाचा सदस्य होऊ इच्छीत आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जलतरण तलावाच्या सदस्यत्वाबाबतचे सर्व नियम मी वाचलेले असुन ते मला मान्य आहेत आणि त्याचे मी पालन करीन. **मला नियमातील अ.क्र.२ मधील तरतुदीनुसार कमीत-कमी २५ मीटर व्यवस्थितरित्या पोहता येते.** त्यानुसार मी माझे हे **आवेदन पत्र माझ्या निवासी पत्त्याचा अधिकृत पुरावा व आरोग्य प्रमाणपत्रासह** सादर करित असुन **जलतरणाचे चाचणीनंतर** माझ्या आवेदनपत्राचा स्विकार करावा व मला जलतरण तलावाचे सदस्यत्व या आवेदन पत्राचे मागील पानावर मुद्रीत नियमातील तरतुदीचे अधिन राहून माझ्या स्वतःचे जबाबदारीवर देण्यात यावे, ही विनंती.

मी जलतरण तलावाचा उपयोग ४५ (पंचेचाळीस) मिनीटाचे कालावधीपेक्षा जास्त नाही इतक्या वेळेसाठी सकाळी/संध्याकाळी __________ वाजता पासुन _________ वाजे पर्यंत करण्यास इच्छुक आहे.

१. संपुर्ण नांव : ______________________________________________

२. जन्म तारीख : ______________________________

३. वय वर्षे : ______________________________

४. कमीत-कमी २५ मीटर पोहण्याचे कौशल्य अवगत आहे काय? **होय** / **नाही**

५. यापुर्वी जलतरण तलावाचे सदस्य होते काय ? **होय** / **नाही**

६. पुर्वीच्या सदस्यत्वाचा नोंदणी क्रमांक __________________*(पासवर नमुद असलेला)*

७. जलतरण तलावाचे सदस्यत्वाचा प्रकार
( ✓ अशी खुण करावी) **मासिक** **त्रैमासिक** **अर्धवार्षिक** **वार्षिक**

८. यापुर्वीच्या सदस्यत्वाचा कालावधी दिनांक ___________________ पासुन ___________________ पर्यंत

९. **संपुर्ण पत्ता :** निवासी पत्त्याचा पुरावा दर्शविणा-या अधिकृत पुराव्याची सत्यप्रत जोडावी.

___________________________________ आवेदकांची स्वाक्षरी

___________________________________ दूरध्वनी क्र. ________________

___________________________________ भ्रमणध्वनी क्र. ________________

***(आवेदन पत्रासोबत निवासी पत्त्याचा पुरावा स्वतंत्ररित्या जोडणे अनिवार्य आहे.)***

## आरोग्य प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/कुमारी ____________________________ यांची वैद्यकीय तपासणी केलेली असुन ते जलतरण तलावाचे सदस्यत्व प्राप्त होण्याच्यादृष्टीने ते संसर्गजन्य रोग, चर्म रोगापासुन मुक्त असुन शारीरिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत.

दिनांक : ________________ वैद्यकीय अधिका-यांची स्वाक्षरी : ______________

शिक्का

## - सत्यापन -

मी ____________________________ सत्यापन सादर करतो की, माझ्याकडून वरीलप्रमाणे नमुद केलेली माहिती पुर्णतः खरी असुन सदर माहिती खोटी अथवा बनावट स्वरूपाची आढळून आल्यास माझ्यावर कायदेशिर कार्यवाही करण्याकरिता विद्यापीठास पुर्ण अधिकार राहील व अशा परिस्थितीत माझ्या जिवीत अथवा वित्त हानीस विद्यापीठ अथवा नियुक्त केलेला कंत्राटदार, त्यांचे कर्मचारी तसेच अन्य कर्मचारी जबाबदार राहणार नाही. खोट्या व बनावट माहितीचे कारणास्तव माझे सदस्यत्व रद्द करण्याचे तसेच माझ्याकडून विद्यापीठ खाती जमा केलेले शुल्क मला परत न करण्याचे पुर्ण अधिकार विद्यापीठास राहील व त्याबाबत माझी कुठलीही हरकत राहणार नाही.

दिनांक : ________________ सदस्याची स्वाक्षरी : ____________________

सदस्याचे पुर्ण नांव : ____________________

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## जलतरण तलाव सदस्यांकरिता नियम

| | |
|---|---|
| १. | जलतरण तलावाचे सदस्य होऊ इच्छिणाऱ्यास कमीत कमी २५ मीटर पोहता येणे अनिवार्य आहे या अटीवर व जलतरण तलावाचे सदस्यत्वाकरिता खालील तक्त्यात आकारण्यात आलेले विहित शुल्क विद्यापीठ खाती व्यक्तीशः रितसर जमा करून तसेच विहित नमुन्यातील आवेदनपत्र विभागात जमा केल्याशिवाय तलावात प्रवेश करता येणार नाही. |
| २. | जलतरण तलाव कोणत्याही कारणास्तव बंद ठेवण्यात आल्यास त्या कालावधीतील शुल्क कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही. |
| ३. | या नियमावलीमध्ये खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना आणि निर्देशाचे पालन करणारी व्यक्ती जलतरण तलाव प्रवेशासाठी सदस्य बनण्यास पात्र असेल. |
| ४. | खोटी व बनावट स्वरूपाची माहिती देऊन जलतरण तलावाचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा सदस्याचे सदस्यत्व कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल व त्यांच्याद्वारे जमा करण्यात आलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही. |
| ५. | जलतरण तलावाच्या सदस्यत्व शुल्काचे दर मा.कुलगुरू महोदयांचे मान्यतेनुसार ठरविण्यात येईल. |

| अ.क्र. | सदस्यत्वाचा प्रकार | संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यापीठ पद्व्युत्तर विभागाचे विद्यार्थी, शिक्षक, विद्यापीठ आस्थापनेतील कायम कर्मचारी आणि विविध प्रधिकारणी/मंडळ सदस्य यांच्याकरिता सन २०१४ या वर्षापासुन लागु असलेले दर | सर्व समान्य सदस्यांकरिता सन २०१४ या वर्षापासुन लागु असलेले दर |
|---|---|---|---|
| अ) | मासिक शुल्क | रूपये ८००=०० | रूपये ९००=०० |
| ब) | त्रैमासिक शुल्क | रूपये १५००=०० | रूपये १८००=०० |
| क) | अर्धवार्षिक शुल्क | रूपये २५००=०० | रूपये ३०००=०० |
| ड) | वार्षिक शुल्क | रूपये ४०००=०० | रूपये ४५००=०० |

| | |
|---|---|
| ६. | सर्व सदस्यांकरिता जलतरण तलाव सकाळी ६.०० ते १०.०० व दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत प्रत्येकास ४५ मिनीटापेक्षा जास्त नाही इतक्या वेळेत पोहण्यासाठी सर्व गुरूवार, २६ जानेवारी, १५ ऑगष्ट, ०१ मे, होळी व धुलीवंदन हे दिवस वगळता उपलब्ध राहील. आवेदनपत्रामध्ये सदस्याने जी वेळ नोंदविली असेल त्या वेळेतच त्यांना पोहण्याचा लाभ घेता येईल. नमुद वेळेशिवाय इतर वेळेस सदस्यांना जलतरण तलावामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. |
| ७. | एकदा भरण्यात आलेले रूपये १००/- इतके नोंदणी शुल्क एक वर्षाचे कालावधीकरिता वैध राहील व नोंदणी शुल्क व सदस्यत्व शुल्कात गणल्या जाणार नाही. नोंदणी शुल्क भरण्यापुर्वी सदस्याची जलतरण चाचणी घेतली जाईल. या चाचणीमध्ये तो उत्तीर्ण झाला तरच त्याला आवश्यकतेनुसार सदस्यत्व शुल्क विद्यापीठ खाती जमा केल्यानंतर बहाल केल्या जाईल. |
| ८. | जलतरण तलावाचा सदस्य बनण्यापुर्वी विहित नमुन्यातील अर्ज सविस्तर पुर्णपणे भरून कार्यालयास सादर करतांना अर्जासोबत सदस्यांच्या शरीरावर जखम, घाव, फोड, फुटकळी, संसर्ग आजार, डोळ्याचा संसर्गजन्य रोग नसल्याबाबतचे तसेच दमा, मिरगी, हृदयरोग असे आजार नसल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. यापैकी कोणताही आजार असल्यास त्याला पोहू दिल्या जाणार नाही. |
| ९. | सदस्यत्वाची मुदतवाढ घ्यावयाची असल्यास त्याला प्रत्येक वेळी वैद्यकीय प्रमाणपत्र देणे अनिवार्य आहे. |
| १०. | **जलतरण तलावाचा उपयोग आवेदकास स्वजबाबदारीवर करावा लागेल. कुठल्याही जिवीत अथवा वित्त हानीस विद्यापीठ अथवा नियुक्त केलेला कंत्राटदार त्यांचे कर्मचारी जबाबदार राहणार नाही.** |
| ११. | आवेदकास अर्ज सादर करते वेळी सादर केलेल्या अर्जासोबत ०२ पासपोर्ट साईजचे छायाचित्र जोडणे आवश्यक आहे. |
| १२. | जलतरण तलावामध्ये पोहतांना दुसऱ्यास पाण्यात ओढणे, जबरदस्ती खोल पाण्यात नेणे, फाजील प्रोत्साहित करणे इत्यादी कृती करण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास त्याचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल व त्यांच्याद्वारे जमा करण्यात आलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही. |
| १३. | जलतरण तलावात पोहण्यासाठी प्रत्यक्ष प्रवेश करण्यापुर्वी तलावाचे परिक्षेत्रातील स्नानगृहामध्ये सदस्यांनी स्वच्छ स्नान करणे अनिवार्य आहे. |
| १४. | लांब केस ठेवणाऱ्या महिला व पुरूष सदस्यांनी पोहतांना उपयुक्त अशी टोपी (Cap) परिधान करणे अनिवार्य आहे. |
| १५. | जलतरण परिक्षेत्रामध्ये पादत्राणे घालून वावरण्यास सक्त मनाई आहे. |
| १६. | विद्यापीठ परिक्षेत्रात धुम्रपानास, मद्यपानास व वेगाने वाहन चालविण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळल्यास संबंधितांचे सदस्यत्व कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द केले जाईल व त्याबदल भरलेल्या शुल्काचा परतावा कोणत्याही सबबीवर परत केला जाणार नाही. |
| १७. | विद्यापीठाचा जलतरण तलाव कोणत्याही अपरिहार्य कारणास्तव बंद ठेवण्यात आल्यास, बंद स्थितीतील कालावधीचे शुल्क अथवा जमा करण्यात आलेले शुल्क कोणत्याही सबबीवर सदस्यांना परत केल्या जाणार नाही. |
| १८. | जलतरण तलावामध्ये शरीरास साबण लावून स्नान करण्यास, कपडे धुण्यास व थुंकण्यास सक्त मनाई आहे. |
| १९. | जलतरण परिक्षेत्रातील व विद्यापीठाचे बागेतील झाडे, रोपे, फुलझाडे इत्यादींना हात लावणे, इजा पोचविणे व फुले तोडणे सक्त मनाईचे आहे. |
| २०. | जलतरण तलावाचे फिल्ट्रेशन प्लँटमध्ये तसेच कॅबीनमध्ये किंवा उद्घोषण कक्ष (Announcing Booth) इत्यादी ठिकाणी सदस्यांना प्रवेश वर्जित आहे. |
| २१. | जलतरण तलावामध्ये पोहण्याकरिता असलेला प्रमाणित पोषाख सदस्यांना स्वखर्चाने आणावा लागेल. |
| २२. | जलतरण तलावाचे सदस्यांव्यतिरिक्त अन्य कोणालाही तलावामध्ये पोहण्यास परवानगी दिल्या जाणार नाही. |
| २३. | जलतरण तलावात पोहण्यासाठी येतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र नेहमी सोबत ठेवणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही. |
| २४. | जलतरण तलावात पोहण्यासाठी येतांना किंमती वस्तु, सोन्या-चांदीचे दागीने, घड्याळ, मोबाईल इत्यादी वस्तु आणु नये. आणल्यास त्या वस्तु सुरक्षित सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित सदस्यांची राहील व गहाळ झाल्यास विद्यापीठ अथवा कंत्राटदार, त्यांचे कर्मचारी व अन्य कर्मचारी जबाबदार राहणार नाही. |
| २५. | जलतरण तलावसंबंधी अधिक उपयुक्त अशा माहितीकरिता संचालक, शारीरिक शिक्षण व रंजन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल. |
| २६. | जलतरण तलाव स्वच्छ व पोहण्यायोग्य ठेवण्यास प्रत्येक सदस्यांनी योग्य ते सहकार्य करावे. |

वरील सर्व नियमांचे मी वाचन केले असुन ते मला/माझ्या मुलास/मुलीस/पाल्यास बंधनकारक असुन त्याचे आम्ही पालन करेल. मी नियमाचे उल्लंघन केल्यास माझे सदस्यत्व रद्द करण्यात यावे व मी जमा केलेले शुल्क मला कुठल्याही सबबीवर परत मिळणार नाही याची मला जाणिव आहे.

आवेदकाची स्वाक्षरी ---------------------------

नांव : ---------------------------------------

******